एम एम आर डी ए
MMRDA

क्र.मुं.म.प्र.वि.प्रा./जाहिरात/०१/१२८४/२०२६, दिनांक :- १९ ऑगस्ट, २०२६

**सरळसेवा भरती २०२६ - सुचनापत्र**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गट-अ, गट-ब व गट-क या संवर्गातील तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील सरळसेवेच्या वाट्यातील रिक्त पदे भरणेकरीता मे.टि.सी.एस. (TCS) यांच्यामार्फत ऑनलाईन स्पर्धा परीक्षा दिनांक ११ व १२ मे, २०२६ रोजी महाराष्ट्रातील प्रमुख जिल्ह्यामध्ये घेण्यात आल्या होत्या. त्यानुसार मे.टि.सी.एस. (TCS) यांच्याकडून प्राप्त झालेली ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहिलेल्या सर्व उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी (Provisional Merit List) प्राधिकरणाच्या https://mmrda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. मे.टि.सी.एस. (TCS) यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या ऑनलाईन स्पर्धा परिक्षेच्या प्रक्रियेबाबत तसेच स्पर्धा परीक्षा दिलेल्या उमेदवारांकडून प्राप्त झालेले / होणारे तक्रार / आक्षेप यांची पडताळणी करण्याकरिता खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| क्र. | नाव व पदनाम | समितीमधील निर्देशित पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री.जॉनी जोसेफ, सेवानिवृत्त मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | प्रो.श्यामप्रसाद करगडे, प्राध्यापक, भारतीय तंत्रज्ञान संस्था (मुंबई) (IITBombay) | सदस्य |
| ३. | प्रो.दासका सत्यनारायण मूर्ती, प्राध्यापक, भारतीय तंत्रज्ञान संस्था (मुंबई) (IITBombay) | सदस्य |

३. ऑनलाईन स्पर्धा परिक्षा दिलेल्या ज्या उमेदवारांना सदर भरती प्रक्रियेसंदर्भात तक्रार, आक्षेप अथवा म्हणणे मांडायचे असेल, त्यांनी पुढील ३० दिवसात आपली तक्रार, आवश्यक पुरावे आणि संबंधित कागदपत्रे प्राधिकरणाच्या vacancymmrda@mailmmrda.maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर सादर करावे.

सही/-
**उप महानगर आयुक्त**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
दू +९१ २२ २६५९ १२३४ ईपीएबीएक्स +९१ २२ २६५९ ०००१ / ४००० फॅ +९१ २२ २६५९ १११२ / १२६४
https://mmrda.maharashtra.gov.in